## ८ स्त्रीच्या मानसिक परिस्थितीबद्दल माहिती

१. सध्या तुम्हाला काही मानसिक आजार आहेत का?

होय/ नाही

२. तुम्हाला पूर्वी कोणत्याही प्रकारचा मानसिक आजार झाला होता का?

होय/ नाही

३. दररोजचे काम, सण-समारंभ यात कशातच रस वाटत नाही अशी बरेच दिवसांपासून निराशा आली आहे का?

होय/ नाही

४. भूक न लागणे, लैंगिक संबंधांत रस ना वाटणे, छातीत धडधडणे, झोप न लागणे यांसारखी लक्षणे महिन्याहून अधिक काळासाठी जाणवत आहेत का? होय/ नाही

५. तुमच्या अंगात येते का?

होय/ नाही

एकूण गुण:

स्त्रीची मानसिक परिस्थिती नाजूक असेल, किंवा तिला एखादा मानसिक आजार असेल, तर तिच्यावर हिंसा होण्याची शक्यता वाढते. तसेच तिची हिंसेला प्रतिकार करण्याची ताकदही कमी होते. कौटुंबिक हिंसा व मानसिक आजार यांचे मिश्रण स्त्रीला आत्महत्येसाठी प्रवृत्त करते. म्हणून मानसिक आजारावर लवकरच उपाय करायला हवेत. मानसशास्त्रज्ञाशी संपर्क ठेऊन स्त्रीला होणारा त्रास त्यांना सांगत राहावा. त्यांच्याकडून मार्गदर्शन अथवा औषधे आवश्यक असल्यास ते स्त्रीला सांगावे.

*(संदर्भ – 'चक्रभेद' – लेखन – मनीषा गुप्ते, अर्चना मोरे – मासूम प्रकाशन – वर्ष १० डिसेंबर २०१०)*